# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक २६/०२/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### फसवणुक

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा वाकोडी येथे दिनांक १२/०२/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— केवलराम किसनजी गागाटे, वय ५१ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर यांना अज्ञात आरोपीने फोन करून 'मै मेजर बोल रहा हूँ,' असा परिचय देवून मोबाईल पेमेन्ट करतो असे म्हणुन लिंक पाठविली व त्याव्दारे फिर्यादीचे बॅक खात्यातून ९८,२००/—रू. उचल करून आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मानकर मो. न. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. नरखेड** :— दिनांक २५/०२/२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वा. सुमारास फिर्यादी ही तिच्या राहते घराचे मागे असलेल्या शौचालयात शौचास गेली असता आरोपी नामे— निखील केशवराव मस्के वय २३ वर्ष रा. बेलोना याने तिच्या घरी अनाधिकृत्तपणे प्रवेश करून फिर्यादीची मुलगी वय ०६ वर्ष हिला चॉकलेटचे आमीष दाखवुन चुकीच्या भावणेने तिचा लाड करून बळजबरीने लैंगिक अत्याचार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (अब),४५१ भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैंगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि पुनम कोरडे पोक्सो सेल काटोल विभाग मो.नं. ७२७६३३०४५५ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**